**गुण नियंत्रण मंडळ, पुणे अंतर्गत उपविभागीय कार्यालयामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता /सहाय्यक अभियंता श्रेणी २ (स्थापत्य) यांची पदे करार पध्दतीने भरणेबाबत...**

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्म्हे राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे व अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे अधिपत्याखालील गुण नियंत्रण विभाग,अलोरे अंतर्गत गुण नियंत्रण उपविभाग,फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग व गुण नियंत्रण विभाग, कोल्हापूर अंतर्गत गुण नियंत्रण उपविभाग, निढोरी, ता.कागल, जि.कोल्हापूर या उपविभागातील जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांचे विवक्षित कामासाठी घेणे व (गुण नियंत्रण संबंधी क्षेत्रिय कामकाज व उपविभागातील प्रकल्पशाखेतील कामकाज ) नामिकासूची तयार करणे यासाठी खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता /सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) | ०२ |

प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करून सुची (Panel) तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांची निवड करताना सुयोग्य उमेदवाराची उपरोक्त नमुद शासन निर्णयामधील विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रशासकीय सोय व कामाची गरज पाहून जास्तीत जास्त ११ महिने कालावधीच्या करार पध्दतीने नेमणूक करण्यात येईल. याबाबत सर्व अधिकार मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे व अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांना राहतील.

सदर नेमणुकी संदर्भातील लागू असलेल्या शैक्षणिकी पात्रता, अनुभव, अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना व इतर सविस्तर तपशील हा महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट https://wrd.maharashtra.gov.in **चे मुखपृष्ठावर तसेच** अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, गुणवत्ता भवन बंगला नं २, येरवडा, पुणे ४११००६ या कार्यालयात उपलब्ध आहे.

तरी पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक अभियंता,गुण नियंत्रण मंडळ,पुणे, बंगला नं २, गुणवत्ता भवन, येरवडा पोस्ट ऑफिसमागे, येरवडा, पुणे-४११००६ या कार्यालयीन पत्त्यावर विहीत नमुद अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह (१ प्रतीत) बंद लिफाप्यात दि.१४/०६/२०२१ रोजी सायंकाली ५.०० वाजेपर्यंत पाठवावेत. विहीत मुदतीत न आलेल्या अर्जाचा तसेच अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण-पुणे
दिनांक २५/०६/२०२१

(सुनंदा न.जगताप)
अधीक्षक अभियंता
गुण नियंत्रण मंडळ, पुणे ०६

e:\aniket२८०१२०१९\बाह्ययंत्रणे मार्फत कअशाअ भरणेबाबत\२nd advertisement\२ nd जाहिरातीचा मसुदा.docx

जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर
प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसुदा.

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्म राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे व अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे अधिपत्याखालील गुण नियंत्रण विभाग,अलोरे अंतर्गत गुण नियंत्रण उपविभाग,फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग व गुण नियंत्रण विभाग, कोल्हापूर अंतर्गत गुण नियंत्रण उपविभाग, निढोरी, ता.कागल, जि.कोल्हापूर या उपविभागातील जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांचे विवक्षित कामासाठी (गुण नियंत्रण संबंधी क्षेत्रिय कामकाज व उपविभागातील प्रकल्पशाखेतील कामकाज ) व नामिकासूची तयार करण्यासाठी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) ही पदे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागातून सेवानिवृत्त झालेले शाखा अभियंता (स्थापत्य) यांची सेवा ११ महिन्याच्या करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात सदर पद भरावयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव व जिल्हा | संवर्ग | पद संख्या | विवक्षित कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १ | गुण नियंत्रण उपविभाग फोंडाघाट ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग | कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) | ०१ | संबंधीत उपविभागांतर्गत चालू असणा-या प्रकल्पांच्या कामाचे गुण नियंत्रण संबंधीत क्षेत्रिय कामकाज, तसेच उपविभागातील प्रकल्प शाखेतील कार्यालयीन कामकाज |
| २ | गुण नियंत्रण उपविभाग, निढोरी ता.कागल, जि.कोल्हापूर | | ०१ | संबंधीत उपविभागांतर्गत चालू असणा-या प्रकल्पांच्या कामाचे गुण नियंत्रण संबंधीत क्षेत्रिय कामकाज, तसेच उपविभागातील प्रकल्प शाखेतील कार्यालयीन कामकाज |

**अर्हता व अनुभव -**

१) उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेतून कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

२) उमेदवार सेवानिवृत्ती पुर्वी शाखा अभियंता (स्था) या पदाचा व प्रकल्पांच्या कामाचे गुण नियंत्रण संबंधीत क्षेत्रिय कामकाज, विभाग/उपविभागातील प्रकल्प शाखेतील कार्यालयीन कामकाज किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीने प्रकरण चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करणे बंधनकारक आहे.

४) करार पदध्तीने नियुक्त करावयाचा उमेदवार हा शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याकडे आवश्यक क्षमता असावी.

**सदर नेमणूका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटींच्या अधिन राहतील. -**

१) सदर नेमणूक जास्तीत जास्त अकरा महिन्यासाठीच राहील. त्यापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात. मात्र एकुण कालावधी ३ वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

२) अर्जदाराला त्यांनी विहित कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण २७१५/प्र.क्र. १००/१३ मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई दि.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणून त्यांना अनुज्ञेय राहील. तसेच करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यांनतरच वेतन देण्यात येईल. त्यामुळे सदरचे वेतन विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

३) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागास/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा व इतर कोणतेही शासकीय लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रू १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

४) करार पध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या (व्यक्ती) अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय १७/०२/२०१६ व वेळोवेळी प्रचलित शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील.

५) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त उमेदवार हा शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रू १००/- च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

६) अर्ज करणा-यास सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्या विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीने प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र (NOC) प्राप्त करून सादर करणे बंधनकारक आहे.

७) नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

८) सदर अधिकारी/कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेला नसावा.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरून शासन निर्णयानुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

११) करार पध्दतीवरील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील.

१२) नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१३) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. प्रशस्तीपत्र /नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

१४) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास शासन /कार्यालय बांधील राहणार नाही.

१५) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१६) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसात आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७) मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्याचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांच्या सुचना फलकावर दि. २१/०६/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तित ईमेलवर तसे कळविण्यात येईल. तसेच मुलाखतीद्वारे प्रशासकीय सोय व कामकाजाच्या दृष्टीने उमेदवार निवडण्याबाबत पुर्ण अधिकार समितीस राहील.

१८) सदर नियुक्ती नेमुण दिलेल्या विवक्षित कामासाठी करण्यात येत असून, त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

१९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय वित्तीय अधिकार राहणार नाही.

२०) उपरोक्त नमुद विभाग/उपविभागीय कार्यालयात शासन स्तरावरून कनिष्ठ अभियंता (स्था)/शाखा अभियंता (स्था)/सहाय्यक अभियंता श्रेणी २ (स्था) यांची नियुक्तीने/पदोन्नतीने/बदलीने वा अन्य कोणत्याही माध्यमातून अभियंते (कर्मचारी) उपलब्ध झाल्याने व त्यामुळे रिक्त पदे निरंक झाल्यास अथवा सदर क.अ./शा.अ./स.अ.श्रे.२ (स्था) या संवर्गामध्ये पुरेसे मनुष्यबळ शासनाकडून उपलब्ध झाल्यास नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

२१) कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांना राहील.

२२) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन/नियुक्ती अधिकारी/ कार्यालय वेळोवेळी ठरवतील त्या अटी शर्ती लागू राहतील याबाबत अर्जदाराने रू १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

ठिकाण-पुणे
दिनांक २५/०५/२०२१

(सुनंदा न. जगताप)
अधीक्षक अभियंता
गुण नियंत्रण मंडळ, पुणे ०६

विहिती नमुन्यातील अर्ज

जलसंपदा विभागातील सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अभियंता

यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबत अर्ज

(टीप — सदरचा अर्ज टंकलेखित करून सादर करावा)

प्रति,
अधीक्षक अभियंता,
गुण नियंत्रण मंडळ, पुणे ४११००६

अर्ज केलेल्या पदाचे नाव - शाखा अभियंता (स्थापत्य)

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | कायमता पुर्ण पत्ता (पिन कोड सहीत) | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) | |
| ४ | ई-मेल (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पुर्ण पत्ता (पिन कोड सहीत) | |
| ६ | जन्मतारीख | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | प्रवर्ग | |
| ९ | लिंग | |
| १० | अवगत भाषा | |
| ११ | शैक्षणिक अर्हता | |
| १३ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| १२ | शासकीय/निमशासकीय सेवेतून कोणत्या पदावरून सेवानिवृत्त झाले आहे. | |
| १४ | कोणत्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेत त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | |

१२ अनुभव

| अक्र. | हुद्दा व मुळवेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरूपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

१३. नेमणुकीसाठी जागेचा पसंतीक्रम-

१४ सध्यस्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशील-

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकलपाचे गुण नियंत्रण संबंधी क्षेत्रिय कामकाज व विभाग/उपविभागातील प्रकल्पशाखेतील कामकाज सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा ११ महिन्याच्या करार पध्दतीने विवक्षित कामासाठी शाखा अभियंता (स्थापत्य) या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदाकरीता जाहिरातीत नमुद विविक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त ११ महिने कालावधीसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार ------------------------------------------------------------------------------------------------ या विभागात/उपविभागात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे सदरचा तपशिल सत्य व अचूक आहे यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणिव आहे.

तसेच जलसंपदा सदर शाखा अभियंता (स्था) पदे भरण्याबाबत जाहिरातीत नमुद शर्ती व अटींच्या मी वाचल्या असून त्या सर्व शर्ती व अटी मला मान्य आहेत.

ठिकाण

दिनांक

अर्जदाराचे पुर्ण नाव व सही